# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर

VILASRAO DESHMUKH GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND SUPERSPECIALITY HOSPITAL, LATUR

मारवाडी राजस्थान शाळेजवळ, गांधी चौक, लातूर (महाराष्ट्र) ४१३५१२

Near Marwadi Rajasthan School, Gandhi Chowk, Latur.( Maharashtra ) 413512

Tel. No. © 02382-249292, (H) 02382-242199 Web Site- www.gmclatur.org

E. Mail – dean_gmchl@rediffmail.com Gazzeted Section E. Mail –dean_gmchl @rediffmail.com


जा.क्र.विदेशावैमवअरुला/आस्था-राज/प्राध्या.सह.प्राध्या. सहा.प्राध्या/जाहीरात/ 7084 /२०२५ दिनांक:-24/११/२०२५

## "थेट मुलाखतीद्वारे (जाहीरात)

विषय :- सहाय्यक प्राध्यापक पदे ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संस्थास्तरावर स्थानिक निवड समितीमार्फत भरणेबाबत..

संदर्भ :- वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक :- एलईसी-१४२४/ प्र.क्र.२२८/वैसेवा-३ दिनांक १८ जुलै २०२४

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार शासन निर्णय दि. १० ऑगस्ट २००१ अन्वये, अधिष्ठातांना प्रदान केलेल्या प्राधिकारात विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करून प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक "गट-अ व ब" या पदावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरती नियुक्तीचे अधिकार संस्थास्तरावर संबंधीत अधिष्ठातांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

सद्य:स्थितीत अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर येथील रुग्णालय पुर्ण क्षमतेने चालण्याकरीता तसेच विविध विभाग कार्यान्वित करण्यासाठी व रुग्णहित, शैक्षणीक कामकाजाच्या दृष्टीने व मनुष्यबळाची कमतरता पडूनये म्हणुन विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपार रुग्णालय, लातूर येथील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे विभागीय निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात ३६४ दिवसांकरीता भरण्यासाठी खालील विषयांकरीता WALKING INTERVIEW दिनांक २७.११.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखत अयोजित करण्यात येत आहे.

| विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर | | |
|---|---|---|
| विषय | पदनांम | रिक्त पदे |
| ऱ्हदयरोगशास्त्र | सहयोगी प्राध्यापक | ०१ |
| उरोशल्यचिकित्साशास्त्र | प्राध्यापक | ०१ |
| | सहयोगी प्राध्यापक | ०१ |
| | सहाय्यक प्राध्यापक | ०२ |
| मज्जातंतुचिकित्साशास्त्र | प्राध्यापक | ०१ |
| | सहयोगी प्राध्यापक | ०१ |
| | सहाय्यक प्राध्यापक | ०२ |
| मज्जातंतुशल्यचिकित्साशास्त्र | प्राध्यापक | ०१ |
| नवजात अर्भक चिकित्साशासत्र | प्राध्यापक | ०१ |
| | सहयोगी प्राध्यापक | ०१ |
| | सहाय्यक प्राध्यापक | ०१ |
| मुत्रपिंडविकारशास्त्र | प्राध्यापक | ०१ |
| मुत्रपिंडशल्यचिकित्साशास्त्र | प्राध्यापक | ०१ |
| | सहयोगी प्राध्यापक | ०१ |
| | सहाय्यक प्राध्यापक | ०१ |
| जळीत व सुघटन विभाग | प्राध्यापक | ०१ |
| | सहयोगी प्राध्यापक | ०१ |
| | सहाय्यक प्राध्यापक | ०२ |
| जिवरसायनशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक | ०१ |
| सुक्ष्मजिवशास्त्र | सहाय्यक प्राध्यापक | ०१ |

**शैक्षणिक अर्हता=-** १) प्रथम द्वितीय,तृितीय वर्ष एमबीबीएस गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्र. (२)एमडी/एमएस/डीएम/एमसीएच परीक्षा गुणपत्रीका/प्रमाणपत्र व प्रयत्न प्रमाणपत्र (३) एमबीबीएस/एमडी/एमएस/डीएस/एमसीएच एमएमसी नोंदणी प्रमाणपत्र (४) अनुभव प्रमाणपत्र. (५) मगासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारासाठी जातीचे प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्र/नॉनक्रिमीलीयर प्रमाणपत्र (३१.०३.२०२६ पर्यतचे) (६) जन्म तारखेकरीता एसएससी प्रमाणपत्र. (७) एचएससी प्रमाणपत्र. (८) एमएस-सीआयटी उत्तीर्ण प्रमाणपत्र



Scanned with OKEN Scanner

**प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक :-** राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार.

**वेतन :- शासन नियमाप्रमाणे-.**

**वयोमर्यादा:-** मुलाखतीच्या दिवशी प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक पदाकरीता खुला प्रवर्गातील उमेदवारांचे वय ४० वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रे:-** अर्जासोबत खालील प्रमाणे साक्षंकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

तसेच प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक तथा तत्सम पदाकरीता उमेदवारांची नियुक्ती ३६४ दिवसाकरिता तात्पुरत्या स्वरुपात अस्थाई स्वरुपाची राहील व सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नामनिर्देशनाने भरेपर्यंत किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यत किंवा मा.संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे मार्फत बंधपत्र उमेदवारांची शिफारस होईपर्यंत यापैकी जे आधी घडले तो पर्यत करण्यात येईल.

**अटी व शर्ती :-**

१) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

२) प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी :- सदरील उमेदवारांना दि. ३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्ठांमधून मागविण्यात येईल.

३) वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय अराखीव वर्गाकरीता ४० वर्षापेक्षा अधीक असणार नाही. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

४) गुणवत्ता यादी ही उपरोक्त नमुद केलेल्या शैक्षणीक अर्हतेनुसार प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहेत.

६) उमेदवार या महाविद्यालया व्यतिरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे "ना-हरकत प्रमाणपत्र" अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरीक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे ? असल्यास केव्हा ? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

७) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) उमेदवाराची निवड करतांना ज्या उमेदवारांनी बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला नाही, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

९) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ ३६४ दिवसांसाठी अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी स्वरुपात राहील. ३६४ दिवसानंतर रिक्त पद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा ३६४ दिवसांसाठी पुनर्नियुक्ती बाबत प्रस्ताव मा.आयुक्त (वैद्यकीय) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

१०) अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांकित साक्षांकित करून जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

११) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१२) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस.डी.एम., एमसी.एच. किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईंट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका. (क) एम.एस.सी. किंवा एस.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधार कार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

(डॉ. उदय. एस. मोहिते)
अधिष्ठाता,
विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय, लातूर

प्रति,

१) उपरोक्त संबंधीत सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, वि.दे.शा.वै.म व अ. रु., लातूर

२) वैद्यकीय अधिक्षक, वि.दे.शा.वै.म. व रुग्णालय लातूर

३) सूचना फलक :- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, बाह्य रुग्ण विभाग, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, वि.दे.शा.वै.म व अ. रु., लातूर

४) अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व अतिविशेषोपचार रुग्णालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत :- १) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

Mahabharti.in



Scanned with OKEN Scanner